आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे अंक पहिला पृष्ठे १२ जानेवारी २०२२ www.parlekar.com Registered-RNI no. 54781/92



या अंकात


पान ०३ कथा हनुमान मार्गाची !

पान ०४ वास्तु वैभव

पान ०६ धंदा ---गुजराथी माणूस बिझनेस असा करतो ?

पान ०९ शाळेच्या मैदानावरची माती...


पान २


**पार्ल्याचे संगीतविश्व पोरके झाले**

# पार्लेभूषण सचिन




यावर्षीच्या पार्लेभूषण पुरस्कारावर हिंदी, मराठी चित्रपट व मालिकांमध्ये सर्वांगसुंदर भूमिका करणारे पार्लेकरांचे लाडके अभिनेते सचिन खेडेकर यांचे नाव कोरले गेले. हनुमान रोड सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळातर्फे दरवर्षी देण्यात येणारा पार्लेभूषण पुरस्कार सचिन खेडेकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी पार्ल्यातील श्रेष्ठ रंगकर्मी अभिनेते बाळ कर्वे होते, तर प्रमुख पाहुणे एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर होते. अकरा हजार रुपये रोख, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्या व्यक्तीने स्वकर्तृत्वाने स्वत:चे व पार्ल्याचे नाव अभिमानाने उंचावले आहे अशा प्रख्यात व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो.

याप्रसंगी बाळ कर्वे यांनी सचिनचे मनापासून कौतुक केले आणि विलेपार्ले लोकसेवा मंडळाच्या उपक्रमाबद्दलही समाधान व्यक्त केले. तर राजीव खांडेकर आपल्या नर्मविनोदी शैलीत म्हणाले, 'मी नुकताच पार्लेकर रहिवासी झालोय. त्यामुळे मला हा पुरस्कार मिळण्याची शक्यता कमीच आहे. ते पुढे म्हणाले 'सचिन खेडेकर यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड अगदी योग्य आहे. याचा मला आनंद वाटतो. विलेपार्ले लोकसेवा मंडळाने अतिशय चांगला उपक्रम राबवला आहे.' भाषणात त्यांनी सचिनचे कौतुक केले. त्याचा स्वभाव, त्याचं पार्ल्यावरील प्रेम, त्याची कार्यशैली यांचा विशेष उल्लेख केला.

पार्लेभूषण पुरस्कार स्वीकारताना व सत्काराला उत्तर देताना सचिन खेडेकर गमतीत म्हणाले, 'माझा जन्म पार्ल्याचा, बाल मंदिर रमाबाई परांजपे, शाळा पार्ले टिळक, कॉलेज पार्ला कॉलेज आणि माझी बँक सुद्धा बँक ऑफ महाराष्ट्र विलेपार्ले शाखा. मी जन्मजात पार्लेकर असून खऱ्या अर्थाने माझा या पुरस्कारावर अधिकार आहे.'

प्रारंभी प्रास्ताविक मंडळाचे कार्याध्यक्ष बाबा कुलकर्णी व प्रदीप शेणॉय यांनी केले. मानपत्राचे वाचन दुर्गेश कुलकर्णी तर आभार प्रदर्शन करूण बिदारी यांनी केले. या समारंभाला सिद्धिविनायक मंदिराचे विश्वस्त संजय सावंत व अथर्व ग्रुपचे सचिन गुंजाळ तसेच बांधकाम उद्योजक प्रवीण राणे आदी मान्यवर उपस्थित होते.




## संपादकीय

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने आपल्या सर्वांना त्रस्त करणारे, अर्थव्यवस्थेची घडी विस्कटणारे, आपल्या प्रियजनांना आपल्यापासून दूर लोटणारे २०२१ हे साल अखेरीस संपले आहे व आपण सर्व मंडळी सुखरूपपणे २०२२ मध्ये पोहोचलो आहोत.

कसे असेल हे नवीन वर्ष? मागील वर्षासारखेच कठीण व क्लेशदायक असेल कि सुखाचे व आनंदाचे असेल? कोरोनाच्या अजून किती लाटा आम्हाला झेलायला लागणार आहेत या वर्षी? नोकरी व्यवसाय स्थिरस्थावर होईल कि जुनेच रडगाणे सुरु राहील? सण समारंभ साजरे होऊ शकतील की नाही? पर्यटनाचा आनंद मिळेल की घरीच कोंडून घ्यावे लागेल? ह्या आणि अश्या अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्या सर्वांना ह्या वर्षी शोधायची आहेत. मित्रांनो, भविष्याच्या पोटात काय दडलंय हे कोणालाच माहित नसते व म्हणूनच जगण्यात गम्मत असते, नाही का !

सध्या आपल्या पार्ल्यात गुलाबी थंडी पडलीये असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. संध्याकाळी पार्ल्यातील गल्ल्यात फिरताना तर आपण एखाद्या हिल स्टेशनवरच आहोत की काय असे वाटते. अर्थात पार्ल्याची थंडी ही एक दोन आठवड्याच्या वर टिकत नाही व म्हणूनच की काय लोक स्वेटर घालायची आपली हौस भागवून घेतायत, क्वचित एखादे आजोबा कानटोपी घालून सुद्धा दिसतात. पुणेकर व मुंबईबाहेरील इतर मंडळी मात्र आपल्याला हसत असतील. म्हणतील, 'मुंबईत थंडी? काय विनोद करताय राव !'

एक मात्र नक्की, ह्या वर्षी मुंबई महानगर पालिकेच्या निवडणूका होणार आहेत. साधारणपणे फेब्रुवारी मार्च मध्ये होणाऱ्या ह्या निवडणूका ह्या वेळी थोड्या पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एक म्हणजे कोरोनामुळे प्रशासनाला निवडणूक घेणे कठीण जाऊ शकते. या शिवाय काही प्रभागांच्या पुनर्रचनेची प्रक्रिया सुरु असून त्यात काही वेळ जाऊ शकतो असेही समजते. ते काहीही असले तरी पार्ल्याच्या राजकीय वर्तुळात निवडणुकीची लगबग सुरु झाल्याचे जाणवते. विलेपार्ले विधानसभा क्षेत्रात एकूण १० वॉर्ड येत असून त्यामधील अनेक ठिकाणी चुरशीची लढत होण्याची शक्यता आहे. कुठले वॉर्ड खुले, आरक्षित किंवा महिलांसाठी आरक्षित होतात ह्यावर सुद्धा बरेच काही अवलंबून आहे. ह्या संबंधीची माहिती 'आम्ही पार्लेकर' आपल्याला वेळोवेळी फेसबुक, युट्युब तसेच मासिक अंकामार्फत पुरवत जाईलच, लक्ष असुद्या !

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
रश्मी मावळंकर
पूर्वा कळंत्रे
editorial@parlekar.com


जाहिरात व्यवस्थापन
रोहित जाधव
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# पार्ल्याचे संगीतविश्व पोरके झाले



मराठी संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक, अभिनेते, संगीत रंगभूमीच्या सुवर्ण काळाचे साक्षीदार आणि आपल्या स्वरांनी नाट्यसंगीताची पूजा बांधणारे रामदास कामत यांना पार्लेकरांची भावपूर्ण श्रद्धांजली.

विष्णुदास भावे पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा जीवनगौरव पुरस्कार आणि अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविलेले रामदास कामत हे खऱ्या अर्थाने 'पार्लेभूषण' होते. त्यांच्या निधनाने आपल्या परिवारातील एक ज्येष्ठ व्यक्ती आपल्याला सोडून गेल्याची भावना पार्लेकरांची आहे.

रामदास कामताना मी प्रथम पाहिल ते मी १४/१५ वर्षांची असतांना 'मत्स्यगंधा' या नाटकात. गोवा हिंदू ॲसोसिएशनचे संगीत मत्स्यगंधा हे नाटक १/५/१९६४ मधे रंगभूमीवर आल. त्यावेळी पार्ल्यात 'मोरबंगला' व्यंकटेश टॉकीज जवळच्या मैदानात नाट्य महोत्सव होत असत. काही वर्षे टिळक मंदीरातही झाले. गोमंतक सेवा संघाचे वसंत घुमे सातत्याने नाट्य महोत्सवाचे आयोजन करत असत. अशा एका नाट्य महोत्सवात मी 'संगीत मत्स्यगंधा' हे नाटक पाहिले. नाटक, त्यातल संगीत कळण्याच माझं वय नव्हतं. परंतु गुंतता हृदय हे, नको विसरू संकेत मीलनाचा या गाण्यांचे तेव्हा ऐकलेले सूर आजही माझ्या कानात रुंजी घालत असतात.




'आम्ही पार्लेकर' च्या वार्षिक विशेषांक प्रकाशन समारंभात श्री. रामदास कामत (डिसेंबर २०१३)





त्यानंतर अधूनमधून रस्त्यातून जाता-येताना त्यांना पहात होते. काही वर्षांनी त्यांच्याच गोमांतक सोसायटीत एकदा कोजागिरी पौर्णिमेच्या कार्यक्रमात मी गायिले होते त्यावेळी




माझी त्यांच्याशी ओळख झाली आणि स्वरबंध जुळले ते कायमचे.

रामदास कामतांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू मी जवळून पाहिले आहेत. कधी कार्यक्रमांच्या निमित्ताने तर कधी मुलाखतींच्या निमित्ताने शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावगीत, चित्रपट संगीत अशा संगीताच्या प्रांतातले त्यांच्या विलोभनीय मुशाफिरीचे आपण सर्वजण चाहते आहोत.

'संगीतमत्स्यगंधा', 'संगीत ययाती देवयानी' या नाटकातील गाण्यांनी रामदास कामत मराठी रसिकांच्या घराघरात आणि मनामनात पोचले तसेच जितेंद्र अभिषेकी हे कल्पक आणि प्रयोगशील संगीतकार मराठी रंगभूमीला लाभले, नव्या पिढीला खूप भावले हे ही तितकेच महत्वाचे.

रामदास कामतांची संगीत रंगभूमीवरील भक्ती आणि संगीत नाटकाला नव संजीवनी मिळाली पाहिजे हा त्यांचा ध्यास मी फक्त पाहिला नाही तर अनुभवलेला आहे.

लोकमान्य सेवा संघात २०११ मधे सांस्कृतिक शाखेचे अध्यक्ष पद त्यांनी स्विकारले आणि या शाखेची कार्यवाह या नात्याने६ वर्षे त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. त्या काळात कामत सरांनी अनेक युवा कलाकारांना नाट्यसंगीत / नाटक यांचे धडे दिले आणि त्यांना शिकवून तयार केले. संस्थेच्या पुलोत्सवात याच कलाकारांना बरोबर घेऊन अनेक उत्तमोत्तम कार्यक्रम सादर केले. युवा कलाकारांसाठी ते फक्त कार्यक्रम नव्हते तर संगीत रंगभूमीची ती एक कार्यशाळा होती.

नमन नटवरा (नाट्यसंगीतातील परिवर्तन), गंधर्व गीत गायन, मत्स्यगंधा, बोला अमृत बोला या पुलोत्सवातील कार्यक्रमांमुळे रसिकांना संगीत रंगभूमीचा सुवर्ण काळ अनुभवता आला.

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या व्यासपीठावरून अध्यक्षीय भाषण करताना त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले होते. ''मराठी संगीत रंगभूमी ही महाराष्ट्राने जागतिक रंगभूमीला दिलेली देणगी आहे. संगीत नाटकाच्या उन्नतीसाठी नव्या संगीत नाटकांच्या उभारणीची आज सर्वाधिक गरज आहे आणि त्यासाठी शासकीय पातळीवर 'स्कूल ऑफ म्युझिकल ड्रामा' ची स्थापना करण्याची आवश्यकता आहे आणि असे झाल्यास मला प्रिय असलेल्या संगीत रंगभूमीला पुन्हा नव संजीवनी मिळेल ....... ''
रामदास कामत

**नीला रवींद्र**
९८१९७५८५६६

# कथा हनुमान मार्गाची!

**मंडळी नमस्कार**

पश्चिम द्रुतगति महामार्ग आणि विलेपार्ले स्थानकाबाहेरील वि.स. खांडेकर रस्ता यांना उत्तरेच्या बाजूने जोडणारा हनुमान मार्ग पार्लेकरांसाठी मरीन ड्राईव्हपेक्षासुद्धा जास्त जिव्हाळ्याचा आहे!

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या आसपास, ठोसरवाडीचे मालक श्रीमान नारायण ठोसर यांचे घरी हनुमंताची एक सुंदर मूर्ती होती. पुढे बरीच भक्तमंडळी शनिवारी त्यांच्या घरी दर्शनासाठी येऊ लागली. त्याने उत्साहित होऊन साहेबांनी स्वतःच्या घरातच १९२१-२२च्या सुमारास एक हनुमान मंदिर स्थापन केले. नंतर, १९७१मध्ये ठोसरवाडीत भव्य इमारत उभी राहिली आणि हनुमानाची मूर्ती जवळच्या विहिरीजवळ एका घुमटीमध्ये स्थापन करण्यात आली. त्या छोट्या घुमटीचे रूपांतर आता एका मंदिरामध्ये झाले आहे. या हनुमंत मंदिरावरूनच या मार्गाला हनुमान मार्ग असे नाव पडले. १९२०-१९२३च्या सुमारास पार्ल्यामधील बरेच रस्ते बनवले गेले. त्यामध्ये हनुमान रोडचाही समावेश होता.




पुण्यामध्ये कॅम्पमधील मोलेदिना रोड आणि सदाशिवपेठेतील टिळक रोड यांमध्ये जी सांस्कृतिक तफावत आहे, काहीशी तशीच विलेपार्ल्यामधील नेहरू रोड आणि हनुमान रोड यामध्ये आहे! मोलेदिना रोडप्रमाणे नेहरूरोड हा कॉस्मोपॉलिटन वाटतो, तर टिळक रोडप्रमाणे हनुमान रोड अस्सल मराठमोळी संस्कृती टिकवून आहे.

आधी पोटोबा, नंतर विठोबा अशी म्हण आहे. हनुमान रोडवर पोटोबा आणि विठोबा हातात हात घालूनच असतात. पार्ल्यातील सर्वाधिक मंदिरे आणि खादाडीची स्थळे जर कुठे असतील तर ती हनुमान रोडवर! त्या दृष्टीने आमचा हनुमान मार्ग इंदूरमधील छप्पनदुकान किंवा सराफा बाजारपेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी नाही!

हनुमान मंदिरात येणारी भक्त मंडळी समोरील गाडीवर वडा खाल्ल्याशिवाय सहसा घरी जाणार नाहीत. पुढे दत्तमंदिरात भजन-कीर्तन सुरू असते, त्याचवेळी समोर डॅफोडिलमध्ये तरुणाईला उधाण आलेले असते. पावभाजीच्या संगतीने प्रेमी जीवांचे वार्तालाप तर पार्सल नेण्यासाठी संसारी लोकांची धडपड!

मंडळी सप्र्यांकडे भाजणीचे पीठ आणि पाचक कोकम सरबत विकत घेत असतात तेव्हा समोर सीसीडीमध्ये कुणाच्या महागड्या कॉफ्या प्यायच्या निमित्ताने गप्पा सुरू असतात. तीस-पस्तीस वर्षांपूर्वीपर्यंत कॅफे कॉफी डे जेथे आहे तेथे पितळे यांचे बटाटावडा केंद्र होते. थकलेभागलेले क्षुधार्थ जीव, (त्यातले बरेच रिक्षावाले असायचे) येथील अप्रतिम वडा-चटणी खाऊन आपली भूक शमवायचे.



पहिला सिग्नल ओलांडला की लगेच उजवीकडे गोकुळचा अमृततुल्य चहा घशाखाली जात असतो त्याच वेळी शेजारी पणशीकरांकडे मराठी खाद्यसंस्कृती जपणारी मंडळी मिसळ, कोथिंबीर वडी, पोहे, पियुष यांच्या 'आहारी' गेलेली असतात, तर काही मंडळी समोर पंकजमध्ये खमण-ढोकळा, फरसाणावर तुटून पडलेली असतात. पंकजजवळच स्वामी समर्थांचा जुना मठ आहे. समोरच मराठी, मालवणी पद्धतीचे, मांसाहारी-मत्स्याहारींमध्ये प्रसिद्ध असलेले गजाली! मराठी, कधीकधी हिंदी चित्रपटसृष्टीतील मंडळीसुद्धा येथे खायला येतात असे आम्ही ऐकून आहोत.

तसेच पुढे गेले की उजवीकडे चक्क मॅकडोनाल्ड दिसते. तीस वर्षांपूर्वी हनुमान रोडवर मॅकडोनाल्ड म्हणजे गारंबीमध्ये मॅकडोनाल्ड असल्याचा धक्का बसला असता. परंतु पार्ल्यातील नव्या पिढीच्या चवी बदलल्या आहेत, त्यामुळे नो आश्चर्य! हनुमान रस्त्याने बदलत्या जगाला अनुसरून कात टाकली आहे याचेच हे द्योतक. या दुकानाच्या कडेलाच एका दाक्षिणात्य माणसाने डोशांचे सेंटर सुरू केले आहे. ते जेव्हा सुरू झाले तेव्हा संध्याकाळी एका विशिष्ट वेळी तिथे फुकट डोसे मिळायचे. अर्थात आमच्या दुर्दैवी नशीबात हा फुकट खाद्ययोग कधी आला नाही!

शाकाहार, मांसाहार, स्ट्रीट फूड याबरोबरच दृष्ट लागायला नको म्हणून हनुमान मार्गावर शिवलीला नावाचे चक्क रेस्टॉरंट अँड बार सुद्धा आहे! शिवलीलाच्या गल्लीमध्ये गुप्ताजींचे भेळपुरी-पाणीपुरी सेंटर कित्येक दशके पार्लेकरांच्या जिव्हाळ्याचा विषय बनून राहिले आहे.

मग पुढे, पार्ले टिळक विद्यालयांच्या इमारतींचा, म्हणजे विद्येच्या मंदिरांचाच समूह आहे. या संस्थेने पार्ल्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला एका पेक्षा एक मोठी मंडळी दिली आहेत. तीन-चार वर्षांच्या मुलाने रमाबाई परांजपे बालमंदिरामध्ये प्रवेश घेतला की तो एकदम पार्ले कॉलेजमधूनच (आताचे साठ्ये कॉलेज) बारावी/बीए/बीएस्सी करूनच बाहेर पडावा, एवढी अप्रतिम व्यवस्था आहे!



रमाबाई परांजपे बालमंदिर रस्त्याच्या सुरुवातीला सुप्रसिद्ध बाबू वडापाव वर्षानुवर्षे पार्लेकरांचे चोचले पुरवत आहे.

नंतर तसेच पुढे दुसऱ्या सिग्नलला, डाव्या बाजूला पार्लेश्वर मंदिर तर सिग्नल पार केल्यावर लगेच उजव्या बाजुला जैन मंदिर ही दोन विशाल मंदिरे आहेत.


येथे महात्मा गांधी मार्ग आणि हनुमान मार्ग एकमेकांना पार करतात. हनुमान मंदिरापासून ते पार्लेश्वर चौकापर्यंत हनुमान रोड हा पार्लेकर मंडळींप्रमाणे अतिशय उत्साही, जिवंत आणि स्फूर्तीने रसरसलेला असतो. हा सिग्नल ओलांडला की मात्र वर्दळ एकदम कमी होते. एखादा घरगृहस्थी, मुलाबाळांची लग्ने झाल्यावर जसा निवृत्त मनस्थितीतील माणसासारखा संन्यस्त, विरागी दिसू लागतो, तसा काहिसा हनुमान रोड दिसू लागतो. नाही म्हणायला वाघबकरी टी लाउंजमधील वर्दळ तो एकांत थोडाफार सुसह्य करते.

पुढे कोपऱ्यावरती जेथे हनुमान मार्ग, खांडेकर मार्गास मिळतो तेथे, डावीकडे पार्ले बिस्कीट फॅक्टरीच्या चौहान कुटुंबियांचा जुना बंगला गतकाळाची आठवण देत उभा आहे.

१९९०च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत हनुमान रोडने वाहतूक दिवे पाहिले नव्हते. एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून हनुमान मार्गाने कात टाकायला सुरुवात केली. दोन चौकात वाहतूक नियंत्रक दिवे बसवले गेले. उत्तुंग इमारतींनी जुन्या इमारतींची जागा घेण्याचा सपाटा लावला आहे. परंतु अजूनही नव्या जुन्याची सांगड घालून हनुमान मार्ग गेली शंभर वर्षे विलेपार्ल्याच्या इतिहासाचा मूक परंतु जिवंत साक्षीदार म्हणून अभिमानाने वाहत आहे.

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५

# वास्तु वैभव



भारताची आर्थिक राजधानी आणि महाराष्ट्राची राजधानी असलेल्या 'आपल्या मुंबई' शहरावर आपले नितांत प्रेम आहे. पण या शहराचा केवळ काही शतकांचा असलेला इतिहास फारच कमी जणांना माहीत आहे. यातील फोर्ट भाग जुन्या ब्रिटिश राजवटीचा केंद्रबिंदू. श्रीमती शारदा द्विवेदी व श्री. राहुल मेहरोत्रा यांनी आपल्या 'बॉम्बे : द सीटीज वीदीन- या पुस्तकात मुंबईचा रंजक इतिहास उपलब्ध करून दिला. त्याचा मराठी अनुवाद 'फोर्ट वॉक्स' किंवा 'फोर्टमध्ये फिरताना' या नावाने श्री. भालचंद्र हर्डीकर या आपल्या पार्लेकरांनी केला. त्याचा आधार घेऊन फोर्ट मधील जुन्या वास्तु वैभवाचा परिचय या स्तंभातून देण्याचा प्रयत्न करत आहोत.

मुंबईचा चेहरा म्हणून ओळखली जाणारी 'गेटवे ऑफ इंडिया' या वास्तू शिल्पाची ओळख आज आपण करून घेऊ. एका बाजूला धडका देणारा समुद्र, मागे शानदार ताज हॉटेलची वास्तु, एकीकडे छ. शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा आणि दुसरीकडे स्वामी विवेकानंदांचे शिल्प. पाश्चात्य प्रगत विचार, भारतीय आतिथ्य, या देशाचा अध्यात्मिक कणखरपणा आणि जगातील सर्व शत्रूंना धडकी भरवणारे या मातीतील स्वाभिमान, शौर्य यांचा सुंदर मिलाप इथे मुंबईचा आणि देशाचा स्वभाव सांगून जातो.

भारत भूमीवर पाय ठेवणारे सिंहासनस्थ राजे पंचम जॉर्ज आणि त्यांच्या पत्नी महाराणी मेरी यांच्या १९११ सालच्या भारत भेटीच्या स्मरणार्थ गेटवे ऑफ इंडिया हे शिल्प उभारण्यात आले. १९१२/१३ साली स्मारकाचे आराखडे व प्रतीके जनतेसमोर ठेवून त्यांची प्रतिक्रिया अजमावण्यात आली. पुढे १९१५/१९ स्मारकाची जमीन समुद्रात ३५ फूट खोलवर भराव टाकून, समुद्रास मागे हटवून तयार करण्यात आली. खरंतर शाही मिरवणूक मार्ग हा स्मारकासमोर सरळ रेषेत बनवायचा ठरले होते. त्यासाठी यॉटक्लब सारख्या अनेक इमारती पाडण्याचाही विचार होता. परंतु मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून त्यात बदल केला गेला. त्यामुळेच पूर्वीचा अपोलो पियर मार्ग किंवा आजचा छ. शिवाजी मार्ग स्मारकासमोर पूर्वेला सरळ रेषेत जात नाही.

गेटवे स्मारकाचे डिझाईन सोळाव्या शतकातील गुजराती स्थापत्यशैलीवर आधारलेले आहे. मुख्य उभारणी पिवळसर रंगातील लाव्हा पाषाण (बसाल्ट) वापरून केलेली आहे. हे दगड ठाणे जिल्ह्यातील खरोडी खाणीतून काढलेले आहेत. स्मारकाचे घुमट व सज्जे बांधणीत मात्र सिमेंट काँक्रीट वापरलेले आहे. कळसाचा मुख्य घुमट ४८ फूट व्यासाचा व टोकाला ८२ फूट उंच आहे. समुद्र मार्गे मुंबईकडे येणाऱ्या प्रवाशांना या भव्य स्मारकामुळे शहराचे दिमाखदार दर्शन घडते. गेटवेचे विधीवत उद्घाटन व्हॉइसरॉय ऑफ इंडिया 'अर्ल ऑफ रेडींग' यांनी ४ डिसेंबर १९२४ या दिवशी केले. गेली ९७ वर्षे हे स्मारक मुंबईचा चेहरा बनून उभे आहे.

संगीता बेहेरे
९८६७७५८३१०





ज्योतिशास्त्र, वास्तूशास्त्र आणि विज्ञान यांच एक पांपरिक अभ्यास

गुरूजी
श्री. शुभम शास्त्री

ज्योतिशपांडित, वास्तुतज्ञ व आध्यत्मिक काय
(गंगापूर, कर्नाटक)

कुंडली परीक्षण, वास्तू परीक्षण, वास्तूला तोडफोड व इजा न करता वास्तूसल्ला वधू-वर कुंडली मिलन व त्या प्रमाणे योग्य मार्गदर्शन, मुलांसाठी करिअर गुईडन्स नौकरी व व्यवसाय या बदल योग्य मार्गदर्शन कुंडली प्रमाणे योग्य भाग्य रत्न सल्ला

सर्व पूजा विधी कार्य पारंपारिक व शास्त्रज्ञा पदतीनी केलेल्या जातात

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे



जन्म कुंडली बनवून मिळेल

अपॉइंटमेंट साठी संपर्क
८३६९२०२८२० / ९८१९२१०९९५

# VILE PARLE

WE HAVE GOT SOME GOOD NEWS FOR YOU

ITS AN

## OCCASION TO CELEBRATE!

codename आरंभ

AS WE HAVE **RECEIVED OC**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 BHK | ₹ 1.49 Cr* ONWARDS | 2 BHK | ₹ 2.06 Cr* ONWARDS | 3 BHK | ₹ 3.55 Cr* ONWARDS |

• READY TO MOVE IN HOME •



**FITNESS CENTRE**
Get an exclusive access to state-of-the-art training equipment.



**CHILDREN'S PLAY AREA**
A dedicated space for children to play, learn & grow at their own pace.



**SITTING AREA**
A dedicated space for residents to sit back, relax & chit chat during their spare time.



**AMPLE PARKING**
A dedicated space for parking along with extra space for guest parking



**WALKING TRACK**
A specially designed paved path will greet all your morning walks, casual jogs or lazy strolls.



**BADMINTON COURT**
Burn some calories & play a game or two at your own badminton court.

**Vile Parle (E) | Call : 926000 22 33** | www.codenameaarambh.com

Disclaimer - *Government charges and taxes applicable. MahaRERA Reg No :-P51800001236

# धंदा ---गुजराथी माणूस बिझनेस असा करतो ?



पेंग्विन - RANDOM HOUSE ह्या जागतिक कीर्तीच्या इंग्रजी प्रकाशन संस्थेने छापलेल्या माझ्या DHANDA - How Gujaratis do business ह्या इंग्रजी पुस्तकाची आधी हिंदी, मग गुजराथी आणि आता मिझो भाषेतली आवृत्ती प्रकाशित होत आहे. ह्या पुस्तकात मुंबईपासून अमेरिकेपर्यंत पोचलेल्या आणि बिझनेसमध्ये अत्यंत यशस्वी ठरलेल्या, पाच गुजराथी बिझनेसमेनच्या गोष्टी मी लिहिल्या आहेत.

२०१३मध्ये DHANDA हे इंग्रजी पुस्तक प्रकाशित झाले आणि काही महिन्यातच ते National Best Seller ठरले. Indian Experess, Business Standard, Hindu अशा सर्व नामांकित वृत्तपत्रांनी, पुस्तकाला पंचतारांकित दर्जा देऊन प्रशंसा केली. Amazon, Flipcart, Goodreads अशा सर्व online platforms वरून पुस्तकाची तडाखेबंद विक्री झाली. त्याचबरोबर वाचकांची शेकडो परीक्षणे छापली गेली.

आजपर्यंत DHANDAच्या २० हून अधिक आवृत्त्या आणि ४०००० हून अधिक प्रती खपल्या आहेत. ह्या पुस्तकाला माननीय श्री. नरेंद्र मोदीजीनी प्रस्तावना लिहिली आहे आणि माननीय श्री. अमिताभ बच्चनजी ह्यांनी लेखकाची ओळख करून दिली आहे.

ह्या सर्व प्रकरणाची सुरुवात झाली ती Times of India मध्ये छापून आलेल्या एका बातमीपासून.

२००६च्या ऑक्टोबर महिन्यातली एक सकाळ. टाइम्स ऑफ इंडियाच्या पहिल्या पानावर एक मोठी बातमी झळकली. जाड अक्षरातला मथळा होता, 'Potels - An Enduring saga in U.S.'

राहण्याची स्वस्त पण ठीकठाक सोय असलेल्या हॉटेल्सना अमेरिकेत म्हणतात मोटेल्स. गेल्या काही दशकात अमेरिकेतल्या गुजराथ्यांनी (ज्यांची आडनावे बहुतांशी 'पटेल' होती)मोठ्या प्रमाणावर ही मोटेल्स खरेदी केली. त्यामुळे अमेरिकन लोकं काहीशा उपहासाने मोटेल्सना 'पोटेल्स' म्हणायला लागले.

पण ह्या बातमीमध्ये 'पोटेल्स' चालविणाऱ्या अमेरिकेतल्या गुजराथी माणसांचा 'उत्तम बिझनेसमेन' असा गौरव करून पुढे असं म्हटलं होतं ' मोटेल्स विकत घेऊन सुरुवात केलेले अनेक गुजराथी बिझनेसमेन आज अनेक पंचतारांकित हॉटेल्सचे मालक आहेत. आज अमेरीकेत Hospitality Industry मध्ये ६०% एवढा मोठा वाटा हा गुजराथ्यांचा आहे."

ह्या बातमीने मला झपाटून टाकले. असं वाटलं, मी जर शोध घेत गेले तर, गुजराथी माणूस मुंबईत असो, की Manhattan मध्ये, तो यशस्वीरित्या बिझनेस कसा करतो, हे मला समजून घेता येईल.

मी मुंबईतले एक जेष्ठ गुजराथी उद्योगपती डॉ. मोहनभाई पटेल ह्यांना भेटले. 'गुजराथी माणूस धंद्यात यशस्वी का आणि कसा होतो', ह्याची उदाहरणे देऊन, मोहनभाईनी विस्ताराने कारणमीमांसाही केली.

मोहनभाईना भेटून घरी परत येईपर्यंत मी ठरवलं होतं, की ह्या विषयावर पुस्तक लिहायचं. विचारापाठोपाठ कृती सुरु केली. मोहनभाईंच्या मार्गदर्शनानुसार एक एक नाव आणि व्यक्ती शोधून काढली. मुंबई, भावनगर, न्यू जर्सी, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन इथल्या भावी कथानायकांशी संपर्क साधला आणि २००८ सालात प्रत्येकाला त्याच्या कामाच्या ठिकाणी, त्यांच्या राहत्या घरात भेटून बोलून आले.

ही सर्व उठाठेव स्वतःच्या आनंदासाठी, स्वतःच्या खर्चाने. सर्व कथा नायकांनी मला वेळ मात्र भरपूर दिला आणि मग २०१० मध्ये Majestic प्रकाशनाने माझं मराठी पुस्तक प्रसिद्ध केलं. त्याचं नाव 'नॉट ओन्ली पोटेल्स.' मराठी पुस्तक चांगलं चाललं. त्यानंतर माझी मुलगी शलाका हिने उत्तम प्रवाही इंग्रजी भाषेत त्याचे भाषांतर केले. Random House सारख्या नामवंत जागतिक प्रकाशनाने ते स्वीकारले आणि इंग्रजी वाचकांनी उत्तम दाद दिल्याने पुढचा इतिहास रचला गेला.

**शोभा बोंद्रे**
९८२३९ ३१०१९









# तुमच्या मुलासाठी/मुलीसाठी चांगला कोचिंग क्लास कसा निवडावा ?

प्रत्येक पालकाला त्यांच्या मुलाला/मुलीला उत्तम दर्जाचे शिक्षण देण्याची काळजी असते. त्यामुळे एक चांगला कोचिंग क्लास कसा निवडायचा यावर आपण चर्चा करू.

१) जेव्हा तुम्ही कोचिंग क्लासला भेट देता तेव्हा त्या कोचिंग क्लासच्या शिक्षकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करा, क्लासच्या व्यवस्थापकाशी नाही. यावरून तुम्हाला शिक्षकांचे व्यक्तिमत्व, देहबोली, संवादाचे स्वरूप याची कल्पना येईल.

२) तुम्ही भेट देत असलेल्या कोचिंग क्लाससाठी काम करणाऱ्या शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि कालावधी जाणून घेण्याचा प्रयत्न करा. कृपया लक्षात घ्या की दीर्घ कालावधीसाठी काम करणारा शिक्षक असणे नेहमीच इष्ट असते. (किमान ५ वर्षे)

३) पुढची पायरी म्हणजे कोचिंग क्लासच्या वर्गाला भेट द्या जिथे तुमचा मुलगा/मुलगी प्रवेश घेणार आहे. जर वर्ग मोठा असेल तर त्या वर्गात जास्त विद्यार्थी बसवले जातील. अशा वेळी शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याला न्याय देऊ शकत नाहीत.

४) कोचिंग क्लासेसने प्रवेश परीक्षा घेतल्यास, कृपया परीक्षेचे स्वरूप, वस्तुनिष्ठ किंवा विषयनिष्ठ, परीक्षेचा अभ्यासक्रम इत्यादी विचारा. प्रश्नपत्रिका आणि विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेवर चर्चा करता येईल का ते विचारा. शिक्षक तुम्हाला तुमच्या मुलाच्या/मुलीच्या चांगल्या गुणांची तसेच कमकुवत गुणांची कल्पना देतील.

५) कृपया कोचिंगमधील माजी विद्यार्थ्यांचे संपर्क क्रमांक विचारा आणि अध्यापन आणि निकालांबद्दल केलेले दावे शोधण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधा.

६) वर्गात विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी शिक्षक उपलब्ध आहेत की नाही याची खात्री करा.

७) कोचिंग क्लासच्या आश्वासनाने (उदा. विशिष्ट तारखेपूर्वी प्रवेश घेतल्यास फी मधे अमुक तमुक टक्के सवलत मिळेल) आणि त्या क्लासच्या शैक्षणिक दर्जाचा संबंध जोडू नका.

८) कोचिंग क्लासच्या शाखा असल्यास, शिक्षक एका शाखेतून दुसऱ्या शाखेत धावत असतील ज्यामुळे ते विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी अनुपलब्ध होतील.

**डॉ. यु. आर. कापडी**
९८६७२ ४४८९१




# 'देणे समाजाचे'- एक सद्भावना महोत्सव




पुण्यातील कै. दिलीप गोखले आणि वीणा गोखले यांच्या प्रयत्नातून सुरु झालेला आणि गेली सतरा वर्ष चालू असलेला 'देणे समाजाचे' हा एक अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे.

'आर्टिस्ट्री' प्रस्तुत 'देणे समाजाचे' हे एक अनोखे व्यासपीठ आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील सामाजिक संस्थांच्या कार्याची ओळख प्रदर्शनाच्या माध्यमातून समाजाला करून देणे, त्यांना आर्थिक तसेच इतर मदत मिळवून देणे आणि त्याच बरोबरीने समाजालाही त्यांचे ऋण फेडण्याची संधी उपलब्ध करून देणे, असा ह्या उपक्रमाच्या मागचा उद्देश आहे. २००५ ते २०२१ ह्या कालावधीत जवळपास २०० सामाजिक संस्था ह्या उपक्रमाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचल्या आणि अंदाजे नऊ कोटी पेक्षा जास्त निधीची भरीव मदत सेवाभावी संस्थांना मिळवून दिली. सहभागी संस्थांकडून कोणतीही शुल्क आकारणी न करता हा उपक्रम गेली १७ वर्षे पुण्यामध्ये व्रतस्थपणे राबवला जातो.

वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या, प्रामुख्याने ग्रामीण, निम शहरी भागातल्या २८ ते ३० सेवाभावी संस्थांचे कार्य प्रदर्शनाच्या माध्यमातून समाजासमोर मांडले जाते . या सर्व संस्था अतिशय काटेकोरपणे निवडल्या जातात जेणे करून योग्य अशा संस्थांना मदत मिळेल.

काय होतं की अनेकांना सामाजिक कार्यासाठी मदत करायची इच्छा असते पण कुठली संस्था योग्य आहे हा प्रश्न पडतो. ह्याचे उत्तर ह्या प्रदर्शनात मिळेल. स्त्रिया आणि लहान मुलांचे प्रश्न, अनाथ मुले, वृद्ध, ग्रामीण विकास, विशेष मुले, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे प्रश्न, अंध, अपंग, दुष्काळग्रस्त भागाचे प्रश्न, धान्य, बँक अश्या विविध विषयांवर काम करणाऱ्या संस्था असतात. या संस्थांचे काम खरच कौतुकास्पद असते. प्रत्येक संस्थेचे प्रतिनिधी त्यांच्या स्टॉलवर माहिती देतात. समाजात उत्तम काम करणाऱ्या अनेक लोकांशी एकाचवेळी संवाद साधण्याची ही एक उत्तम संधी असते. हे प्रदर्शन पाहण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही. डोनेशन द्यायलाच हवे अशी सक्ती /सूचना नाही. आपण आर्थिक किंवा इतर स्वरूपातील मदत करू शकता (सेवा, वस्तू, कपडे, विशेष कौशल्य वगैरे)

देणगीदार आणि सामाजिक संस्था, यामध्ये एक विश्वासार्ह दुवा ठरलेला 'देणे समाजाचे' हा उपक्रम २०१९ पासून मुंबईमध्ये विलेपार्ले येथे आयोजित केला जातो. आता २०२२ मध्ये हा




उपक्रम १२, १३ फेब्रुवारी दरम्यान पार्ले येथे सावरकर केंद्रात (महात्मा गांधी रोड, सनसिटी थिएटर जवळ, पार्ले पूर्व ) आणि २६, २७ फेब्रुवारी दरम्यान ठाणे येथे सीकेपी हॉल, खारकर आळी, कोर्ट नाका येथे आयोजित केला जाणार आहे.

**वीणा गोखले**
९८२२० ६४१२९

# वाघांच्या आयुष्यावर बोलू काही - भाग२

आसपास

ताडोबा जंगलातील अशीच एक संध्याकाळ. वाघाच्या पावलांच्या ठश्यांवरून त्याचा माग काढत जंगलातील कंबरेपर्यंत गवत असलेल्या माळरानाजवळ जिप्सीत बसून आम्ही काही पाहायला मिळेल या आशेने वाट पाहत होतो.



वाघ पाहायचा असेल तर संयम फार महत्वाचा. आपल्याला जेव्हा एखादा वाघ दिसतो तेव्हा त्याने आपल्याला १०० वेळा पाहिले असते. मानवा पासून सुरक्षित अंतर ठेऊन आणि दृष्टीस न पडेल याची खबरदारी घेऊन तो संचार करतो. समोरील कुरणावर ठिपकेदार हरणे, सांबर, नीलगायी चरत होत्या. झाडावरील माकडे पाठशिवणीचा खेळ खेळत या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारत होती. झाडाच्या शेंड्यावर एक नरवानर अतिशय एकाग्रतेने आजुबाजूच्या परिसराचे निरीक्षण करत होता. वाघ, बिबळ्या असे मांस भक्षी प्राणी नजरेस पडताच आपापल्या टोळीला सावध करणे हे त्याचे काम. नर माकडे आळीपाळीने ही जबाबदारी पार पाडतात.

अचानक सावध माकडाने धोक्याचा इशारा दिला. लहान पोरे आयांना बिलगली. पाठशिवणीचा खेळ अचानक थांबला. संपूर्ण टोळी भराभर फांद्या चढून सुरक्षित उंचीवर गेली आणि भयभीत नजरेने कुरणापलीकडील झाडाकडे विचित्र आवाज करत पाहू लागली. जमिनीवर हरणांचे धोक्याचे इशारे सुरु झाले. नर, माद्या, पिल्ले जंगलाकडे तोंड करून आणि



पुढील पाय जमिनीवर आपटत एकाग्रतेने पाहत होती, नाक वर करून हवेतील गंध घेत होती. जंगलातून कुराणाकडे येणाऱ्या जंगल वाटेवर दूरवर हालचाल जाणवत होती. प्राण्यांच्या धोक्याच्या आवाजाचा गोंधळ आता टीपेवर पोहचला. पढघमावर थाप पडावी, वाद्यांचा झंकार टिपेला पोहचावा आणि एखाद्या शेहनशाहने मानवंदना स्वीकारत दरबारात प्रवेश करावा अशाच थाटात आपल्या संथ पण डौलदार चालीने वाघाने रंगमंचावर प्रवेश केला. चार पाच फूट उंची, पिळदार बाहू, नाकापासून शेपटीपर्यंत साधारण १० फूट लांब आणि २५०-३०० किलो वजन असलेला वाघ केवळ प्राण्यांच्याच नाही तर मानवाच्याही मनात धडकी भरवतो. त्याची नजरच अनेक प्राण्यांना गारद करते. त्याची डरकाळी खऱ्या अर्थाने काळजाचे ठोके वाढवते. असं असून देखील त्याची चाल इतकी डौलदार असते की फॅशन शोमधील रॅम्प वॉक करणाऱ्या कलाकारालाही हेवा वाटावा. जंगलातील लोकांनी या वाघाचे बारसं करून त्याचे नाव युवराज ठेवले आहे. किती सार्थ आहे ते याची खात्री पदोपदी पटवत तो जंगलवाटेने येऊन, जिप्सीच्या बाजूने जंगलात गेला.

युवराज नुकताच वयात येऊन आपल्या आई पासून विभक्त झाला होता. निसर्गाचे नियम किती कठोर असतात पहा. अगदी नाव युवराज असलं तरी वयात आलेल्या कुठल्याही वाघाचं



आयुष्य खडतर असतं. आईपासून वेगळे झाल्यावर वाघांना आपले राज्य आपणच स्थापन करायचे असते. मानवी खेळात राज्य घेणे खूपच सोपे असले तरी निसर्गाच्या नियमात अतिशय अवघड असते. आपले राज्य स्थापन करण्यासाठी त्याला अगोदरच्या राजाशी द्वंद्व करावे लागते. अनेकदा ह्या लढती प्राणांतिक ठरतात. कुठल्या प्रस्थापित वाघाला आपण हरवू शकतो याचा अंदाज मैलोनमैल पायपिट करून (आणि तेही दृष्टीपथात न पडता) घ्यावा लागतो. विजयाचे डावपेच, योग्य संधी यावर लक्ष केंद्रित केले नाही तर जीवाला मुकावे लागते. दोन वाघात झालेल्या युध्दात दोनही वाघ जबरदस्त जखमी झाले आहेत, रक्ताचा माग पाठी ठेवत तहान भागवण्यासाठी पाणी शोधत भटकत आहेत अशा नोंदी अनेक शिकारी, वन्यजीव अभ्यासकांनी करून ठेवल्या आहेत. 'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' हे किती सार्थक आहे याबाबतीत!

विजयी झालेला वाघ मग आपली हद्द मलमूत्र विसर्जन करून आणि नाकं मुडपून त्याखाली असलेल्या ग्रंथीमधून पाझरणारा द्रव झाडावर घासून तसेच नखांचे ओरखडे काढून सुनिश्चित करतो. नर वाघाची हद्द ६०-१०० स्क्वे. किमी असते. मादीची साधारण १५-२०. जेव्हा वाघांचे अधिवास संकुचित नव्हते तेव्हा हीच हद्द २००-३०० स्क्वे. किमी असे. मोठ्या वाड्यातून फ्लॅटमध्ये आल्यावर जशी कुचंबणा होते ती अवस्था मानवाने निसर्गाची पण केली आहे. कधी थांबणार हि जंगलतोड ?

एकदा आपली हद्द आखून झाली की नर शिकार करायला किंवा आपल्या हद्दीतील चार-पाच वाघिणींशी संग करायला मोकळा असतो. नुकताच राज्य मिळवलेला वाघ आपली प्रजा वाढवायच्या मागे असतो. एखाद्या वाघिणीची पूर्वीच्या वाघा पासून झालेली पिल्ले लहान असतील तर त्यांना मारून टाकायलाही नवा राजा मागे पुढे पाहत नाही. पिल्ले मारून टाकल्यावर वाघीण दु:ख पुसून संग करायला तयार होते. नर वाघ मुलांचे पालनपोषण करण्यात मात्र बिलकुल हातभार लावत नाहीत. मिळवलेले राज्य ४-५ वर्ष टिकवता येते. उतार वयात दुसरा तरुण, ताकदीचा वाघ राज्य काबीज करतो. पराभूत राजा मग आपल्या राज्याच्या सीमेबाहेर किंवा राजा नसलेल्या भागात फिरत राहतो. आपली उपजीविका करतो.

युवराज हा मटकासुर नावाच्या थोड्या पोक्तपणाकडे झुकलेल्या ताकदवान नराच्या हद्दीवर डोळा ठेऊन होता. योग्य संधीची वाट पाहत होता आणि नशिबाने ती त्याला मिळाली. पांढर पौनी पाणवठ्यावर एकदा अस्वलाशी झालेल्या झुंजीत मटकासुर जखमी झाला. जखमा भरून आल्यातरी मटकासुराचा आत्मविश्वास डळमळीत झाला. शरीरावरच्या जखमा भरल्या तरी मनावर झालेल्या जखमा मानसिकरित्या त्याला कमकुवत बनवत होत्या. याच संधीचा फायदा घेत युवराजने मटकासुराला हुसकावून



लावले. लॉकडाऊन संपल्यावर दीड-दोन वर्षांनी मी ताडोबाला गेलो असताना त्याचे अनेक किस्से ऐकले. युवराज आता स्थिरावला आहे. खऱ्या अर्थाने त्याच्या अंगावर मूठभर मांस चढले आहे. तो अधिक बलवान झाला आहे........ आणि शेरास सव्वाशेर भेटेपर्यंत राज्य उपभोगणार आहे.

हे निसर्ग चक्र आपल्याला कितीही विचित्र वाटत असलं तरी निकोप, सुदृढ संतती आणि चांगल्यात चांगल्या जीवांची उत्क्रांती व्हावी म्हणून निसर्गाने केलेली हि रचना आहे. निसर्ग कुठलीच गोष्ट कारणाशिवाय करत नाही. अशा नियमांमुळे हे चक्र अनादि अनंत काळापासून चालत आले आहे आणि चालू राहणार आहे. जुन्याचा ऱ्हास आणि नव्याची निर्मिती हा निसर्गाचा मूलभूत पाया आणि सिध्दान्त आहे. अगदी केशवसुतांसारखे कवी सुध्दा ' जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळून किंवा पुरून टाका.....' या काव्यपंक्ती लिहून याच कल्पनेचा विलास करताना दिसतात.

**संजय देवस्थळी**
९८३३८६६४६२

नवरी सजली

**आपले सण २०२२**

|| श्री स्वामी समर्थ ||

|| मकर संक्रांत ~ जानेवारी १४, २०२२ शुक्रवार (पौष)
|| श्रीगणेश जयंती (माघी गणेश जयंती) ~ फेब्रुवारी ४, २०२२ शुक्रवार (माघ)
|| महा शिवरात्री ~ मार्च १, २०२२ मंगळवार (माघ)
|| होळी ~ मार्च १७ २०२२ शुक्रवार ( फाल्गुन )
|| गुढीपाडवा ~ एप्रिल २, २०२२ शनिवार ( चैत्र)
|| अक्षय्य तृतीया ~ मे ३, २०२२ मंगळवार ( वैशाख )
|| वट पौर्णिमा ~ जून १४, २०२२ मंगळवार ( जेष्ठ )
|| आषाढी एकादशी ~ जुलै १०, २०२२ रविवार ( आषाढ )
|| नाग पंचमी ~ ऑगस्ट २, २०२२ मंगळवार (श्रावण )
|| रक्षाबंधन ~ ऑगस्ट ११ , २०२२ गुरुवार ( श्रावण )
|| गोकुळाष्टमी ~ ऑगस्ट १९, २०२२ शुक्रवार ( श्रावण )
|| हरतालिका ~ ऑगस्ट ३०, २०२२ मंगळवार ( भाद्रपद )
|| गणेश चतुर्थी ~ ऑगस्ट ३१, २०२२ बुधवार ( भाद्रपद )
|| गौरी पुजा ~ सप्टेंबर ४, २०२२ सोमवार ( भाद्रपद )
|| अनंत चतुर्दशी ~ सप्टेंबर ९, २०२२ शुक्रवार (भाद्रपद )
|| घटस्थापना ~ सप्टेंबर २६, २०२२ सोमवार ( अश्विन )
|| दसरा ~ ऑक्टोबर ५, २०२२ बुधवार ( अश्विन )
|| दिवाळी ~ ऑक्टोबर २४, २०२२ सोमवार (अश्विन )
|| भाऊबीज ~ ऑक्टोबर २६, २०२२ बुधवार ( कार्तिक )
|| तुळशी विवाह ~ नोव्हेंबर ५, २०२२ शनिवार ( कार्तिक )
|| श्रीदत्त जयंती ~ डिसेंबर ७,२०२२ बुधवार (मार्गशीर्ष )

सण समारंभ सुशोभित करण्यास लागणाऱ्या वस्तू मिळवण्याचे एकमेव ठिकाण

दिपा लेले चेउलकर
९८६७०८८८७७

# शाळेच्या मैदानावरची माती...



मधल्या सुट्टीचा आदला तास किंवा सहामाही आणि वार्षिक परीक्षेचा शेवटचा पेपर, दोन्ही वेळेला कानात प्राण आलेले असायचे. लक्ष असायचं ते होणाऱ्या घंटेकडे. कधी एकदा हातातलं पेन बाजूला ठेवून मैदानावर खेळायला जातोय असं व्हायचं. परीक्षेच्या शेवटच्या दिवशी तर ही ओढ अधिकच असायची. परीक्षेसाठी वापरण्यात आलेल्या पॅडची व्हायची बॅट आणि रुमाल, सॉक्स यांचा व्हायचा बॉल आणि मग तुफान मॅच रंगायची. शाळेच्या या आठवणी आयुष्याच्या कोणत्याही वळणावर सोबतच असतात. पार्ले टिळक मराठी माध्यमाच्या १९९७ ची बॅच याच आठवणी पुन्हा जगायचा प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचा भाग म्हणून क्रिकेट मॅच, कान्हेरी भटकंती, शाळेतील शिक्षकांसाठी रंगखेळ असे उपक्रमही आयोजित केले होते. मात्र करोनामुळे यात गेल्या वर्षी खंड पडला. यंदा निर्बंध शिथिल झाल्यानंतर पुन्हा एकदा शाळेच्या मातीत खेळण्याची आस लागली आणि १९ डिसेंबर रोजी क्रिकेट सामन्यांच्या निमित्ताने हा आनंद पुन्हा अनुभवला. साधारणपणे या क्रिकेट मॅचची तयारी महिनाभर आधी तरी सुरू होते. शाळेकडून परवानगी काढण्यापासून, नाश्ता, दुपारचे जेवण, जिंकणाऱ्यांसाठी ट्रॉफी असा साग्रसंगीत कार्यक्रम केला जातो. पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाने मैदानावर खेळण्याची परवानगी दिली आणि कोरोनामुळे निर्बंध पुन्हा नको लागायला अशी प्रार्थना करत या मॅचची तयारी सुरू झाली. सगळ्यांमध्येच पुन्हा एकदा आनंद, उत्साह संचारला. तशी शाळेच्या मैदानावर धमाल-मस्ती केलेल्यांना हीच धमाल मस्ती पुन्हा अनुभवावीशी वाटतेच पण प्रत्यक्ष मैदानावर येणं सगळ्यांना जमेलच असंही नसतं. क्रिकेट खेळायला येणाऱ्यांमध्ये डॉक्टरही असतात, वकीलही आणि उद्योजकही. मुंबईबाहेर स्थायिक झालेलेही अनेक जण यासाठी उत्सुक असतात. या उपक्रमामध्ये केवळ बॅचमेट्सच नाहीत तर त्यांचे पार्टनर, बच्चेकंपनी यांनाही सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो. पार्ले टिळक हे एक मोठं कुटुंब आहे. या कुटुंबाशी जोडलेल्या सगळ्यांमुळेच ही धमालमस्ती आणि आनंद कैक पटीने वाढत जातो, यावर विश्वास ठेवून ९७ ची बॅच हे उपक्रम राबवत आहे.

यंदा तिसऱ्या वर्षी



क्रिकेटचे सामने रंगले. या आधी सन २०१८ आणि २०१९ मध्ये मॅचेस झाल्या. यंदा क्रिकेट खेळण्यासाठी कुणी नाशिकहून आलं, कुणी कोकणातून, कुणी क्रूझवर असताना हे सारं मिस करतोय म्हणून फोन केला तर कुणी आमच्या बॅचच्या फेसबुक पेजवरून लाइव्ह पाहत होतं. कधी कुणाला ऑफिसच्या कामामुळे जमत नाही, पण मन मात्र शाळेच्या मैदानावर पोहोचतं. नऊ तुकड्यांमधून सगळी गोळाबेरीज करत-करत ५०-६० जण मॅचेससाठी पोहोचतात. त्यांच्यामध्ये चार, पाच टीम पाडल्या जातात, कुणीतरी हौशी खेळाडू कॅप्टन होतात, कुणी जिंकून ट्रॉफी घरी घेऊन जातं तर कुणी पोटभर आनंद. सकाळी आठपासून सुरू झालेले हे सामने दुपारी चार-पाचपर्यंत सुरू राहतात. या निमित्ताने शाळेच्या क्रीडामहोत्सवातील आठवणी जागवल्या जातात. या सामन्यांमध्ये ढालीसाठी भांडणाऱ्या तुकड्या वेगळ्या नसतात तर सगळे एकत्र येऊन आनंदासाठी खेळतात. पण अजूनही ट्रॉफी, मेडल घेऊन फोटो काढले आणि मिरवले जातात. शाळेतलं लहानपण तेवढंच अनुभवता येतं.

यंदा क्रिकेटच्या खेळांसोबतच लहान मुलांसाठी ग्लास पेंटिंग, बॉटल पेंटिंग हा 'रंगखेळ'चा उपक्रमही आयोजित करण्यात आला होता. नाताळच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांनी सांता, रेनडिअरपासून अनेक चित्रं रंगवली. या उपक्रमांची सुरुवात झाली तेव्हा ९७ ची संपूर्ण बॅच एकत्र यावी हा तर उद्देश होताच, मात्र इतर अनेक बॅचच्या मंडळींनी एकत्र येऊन एक सशक्त नेटवर्क तयार व्हावं हाही उद्देश होता. आम्ही पुन्हा संवादातून नव्या वाटा शोधत आहोत. शाळेच्या मातीने आम्हाला बांधून ठेवलंय. तुम्हाला असे उपक्रम आयोजित करायचे असतील, काही मदत हवी असेल तर आमच्याशी नक्की संपर्क साधा. आमची सगळी बॅच प्रचंड उत्साही आहे त्यामुळे मदत नक्की करू.




**-पार्ले टिळक विद्यालय**
१९९७ बॅच, मराठी माध्यम

देशोदेशी

# सालार दे उयुनी

मी हॉटेलमध्ये पोचल्याबरोबर खोलीत शिरून दार बंद केलं आणि पहिली गोष्ट केली म्हणजे हाताच्या बोटाला थेंबभर पाणी लावून ते भिंतीवर घासलं आणि तोंडात घातलं. आता वय साठीच्या पुढे गेल्यामुळे अगदीच लहान मुलासारखं भिंत थेट जिभेनं चाटून पाहण्याचं धैर्य काही मला झालं नाही! कारण आमचं उयुनी (बोलिव्हिया) वाळवंटाच्या सीमेवरचं हे हॉटेल मिठाच्या विटांनी बांधलं आहे असं ऐकिवात होत. भिंतीच्या विटा जरी मिठाच्या बनविलेल्या दिसत असल्या (खडे-मिठाचे स्फटिक त्यात स्पष्ट दिसत होते) तरी चाटलेलं बोट काही खारट लागलं नाही. माझ्यासारख्या पाहुण्यांनी चाटून चाटून भिंतींना खड्डे पाडू नये म्हणून बहुधा त्यावर कसलंतरी संरक्षक पण पारदर्शक रोगण लावलेलं होतं.



अर्थात आमचं हॉटेल मिठाच्या विटांनी बांधलं ह्यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नव्हतं कारण आजूबाजूच्या १०००० स्क्वे. कि.मी. पेक्षाही मोठ्या परिसरात मिठाशिवाय दुसरं काहीच नाही. सालार दे उयुनी किंवा उयुनी सॉल्ट फ्लॅट्स -ह्याचं मराठीत नक्की भाषांतर कसं करावं हे मलातरी माहित नाही. मिठाचं मैदान असं म्हटलं तर त्याच्या प्रचंड आकाराची (१००००स्क्वे. कि.मी) कल्पना वाचणाऱ्याला येणार नाही. मिठाचं वाळवंट म्हणावं तर तिथे कणभरसुद्धा वाळू दिसायची नाही. आपल्या देशातही कच्छच्या वाळवंटाचा काही भाग दरवर्षी काही महिने असाच मिठाने झाकलेला असतो. पण मूलत: तो प्रदेश वाळवंटच आहे. दरवर्षी पावसाळ्यात नजीकच्या समुद्राचं पाणी ह्या वाळवंटी प्रदेशावर पसरतं आणि पाऊस संपल्यावर त्याचं बाष्पीभवन होऊन मिठाचा थर मागे राहतो.

सालार दे उयुनी मात्र सुमारे चाळीस हजार वर्षांपूर्वी तिथे असलेल्या तलावाचं (लेकमिंचिन) पाणी भूगर्भात घडलेल्या घडामोडींमुळे आटून गेल्यामुळे निर्माण झालं. ह्या उलथापालथीनंतर समुद्रसपाटीपासून सुमारे ३७००मीटर्स (१२००० फूट) उंचावरच्या ह्या पठारावर मागे राहिला, तो मुख्यत: मीठ (सोडियम क्लोराईड) आणि मॅग्नेशियम क्लोराईड, लिथियम क्लोराईड ह्यांनी बनलेला कित्येक मीटर खोल थर. येथील लिथियमचा साठा सर्व जगातील लिथियम पैकी सुमारे ७ टक्के इतका मोठा आहे. लिथीय मला आजच्या पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याच्या प्रयत्नांमध्ये फार महत्व आहे कारण पर्यावरण नाशक विद्युत उत्पादनाला (खनिजतेल, कोळसा वापरून होणाऱ्या) पर्यायी कुठल्याही पद्धती (सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इत्यादी) ऊर्जेचा साठा करण्याच्या कार्यक्षम बॅटरीतंत्रज्ञानाशिवाय व्यवहार्य होणं शक्य नाही, आणि लिथियम हा ह्या बॅटरीमधील प्रमुख घटक आहे. उयुनीचं हे शुभ्र पठार इतकं सपाट आहे, की ह्या पठाराच्या समुद्रसपाटीपासूनच्या उंचीमध्ये एक मीटरपेक्षा कमी भिन्नता त्याच्या १०००० स्क्वे. कि. मी क्षेत्रात आढळून येते. त्यामुळे अवकाशात फिरणाऱ्या उपग्रहांमधील अल्टी मीटर (समुद्र सपाटीपासूनची उंची मोजण्याचं यंत्र) किती अचूक आहेत हे ठरविण्यासाठी (कॅलिब्रेशन) ह्या पठाराचा वापर केला जातो!



अर्थात उयुनीची जादू ह्या अश्या रुक्ष माहितीमध्ये दडलेली नाहीच. उयुनीची जादू आहे त्याच्या अथांगतेत, अमर्यादित विशालतेत. ती आहे त्याला शब्दात पकडण्याच्या कुठल्याही प्रयत्नांच्या असमर्थतेत आणि कुठल्याही कॅमेऱ्याच्या फोटोत बद्ध होण्याच्या अशक्यतेत.

किनाऱ्यावर उभं राहून समुद्राचं नजर पोचेल तेथपर्यंत दिसणार निळं पाणी किंवा एखाद्या डोंगर माथ्यावरून दिसणारं अथांग आकाश पाहण्याची आपल्याला सवय असते. पण अश्या जागी काहीतरी सतत घडत असतं, समोरच्या दृश्यामध्ये काहीतरी वैविध्य असत. एखादी लाट समुद्राच्या पाण्यात उसळी घेते, आकाशातून एखादा ढग तरंगत जातो किंवा एखादी घार दूरवर घिरटया घेताना दिसते. जरा नजर वळवली तर एखादी माडांचीराई दिसते,



डोंगराच्या उतारावर हिरव्या गवतात पडलेला पिवळ्या फुलांचा सडा दिसतो. बाकी काही नसलं तरी वाऱ्याचा आवाज कानावर पडतो.

उयुनीच्या पठारावर उभे राहिल्यावर फक्त दोनच रंग नजर फिरवावी तिथे दिसतात - डोळे दिपवणारा, शुभ्र एक संध पांढरा आणि तो संपतो तेथपासून दिसणारा गर्द निळा. भवताली संपूर्ण अंधार झाल्यावर जशी पूर्व कुठली, पश्चिम कुठली अशी दिशांची जाणीव पूर्णपणे नाहीशी



होते, तसंच इथे चकचकीत सूर्य प्रकाशात होऊन जातं आणि नि:स्तब्धता तर अशी, की आपल्याच पापण्यांची फडफड आपल्याच कानावर पडावी, आपल्याच हृदयाचे ठोके ढोल वाजविल्या सारखे आपल्यालाच ऐकू यावेत.

समोर पाहण्यासारखं काहीही - म्हणजे एखादा हिमालयासारखा उत्तुंग पर्वत, वेरूळसारखी थक्क करणारी कलाकृती, अथांग सागर, फुलांचा गालिचा घातलेलं कास सारखं पठार असं काहीही - नसताना सुद्धा आपण काहीतरी भव्य, नेत्रदीपक पाहत आहोत असा अनुभव ह्यापूर्वी मलातरी कधीच आला नव्हता. ही दृष्टीला न दिसणारी पण मनाला जाणविणारी भव्यता फोटोमध्ये पकडणं मलातरी शक्य नाही - जे आडातच नाही ते पोहऱ्यात येणार कुठून! पण तरी सुद्धा दोन फोटो वानगीदाखल इथे जोडले आहेत.

जो लेक मिंचिन आटल्यामुळे उयुनीची निर्मिती झाली त्याचे अवशेष काही भागात अजूनही आहेत आणि उयुनीचा तो भाग पाण्याच्या अगदी उथळ (२ - ४सेंटीमीटर) थराखाली झाकलेला आहे. हे पाणी इतकं अविचल असतं की त्याचा कित्येक कि.मी. व्याप्तीचा आरसा बनतो . इथे पाऊस क्वचितच पडतो आणि जेंव्हा पडतो तेंव्हा अगदी थोडा पडतो. परंतु जेंव्हा तो पडतो तेंव्हा जवळजवळ संपूर्ण उयुनीचा असा प्रचंड आरसा होतो आणि सूर्यास्ताच्या वेळी ह्या आरशात निर्माण झालेलं दृश्य केवळ अवर्णनीय असतं.

उयुनीला लागूनच सुरु होणारं आणि चिले देशाच्या सीमेपर्यंत पसरलेलं सिलोली वाळवंट हा ही असाच चमत्कारांनी भरलेला अद्भुतप्रदेश आहे. त्याचा प्रवास पुढच्या दोन लेखात.

सतीश जोशी
९८२०२२८२७९

# सौम्य, सोजवळ तरीही कणखर

मोठ्ठं कुंकू, सौम्य प्रसन्न सोज्वळ चेहेऱ्याच्या वंदना ताई.. डॉ. वंदना कट्टी आणि सुप्रसिद्ध शांक-नील या संगीतकार जोडीतील सुनील सर,



डॉ. सुनील कट्टी हे संगीत क्षेत्रात मग्न जोडपं, पार्ल्याला सुपरिचित आहे.

वंदनाताईंचा जन्म आणि बालपण गोदरेज, विक्रोळी येथील. आई सौ. इंदिरा शिरोडकर आणि वडिल श्री. मोहन शिरोडकर दोघांनाही संगीताची आवड होती. आई रेडिओवरील गीते ऐकून सुरेल गात असे. वडील हार्मोनियम वाजवत. कीर्तनाची साथ करत. आपल्याला जमलं नाही, निदान मुलांनी तरी या क्षेत्रात यावं अशी दोघांचीही इच्छा होती. वडील वंदनाताईंना घरीच गाणी शिकवत. हार्मोनियमवर तयारी करून घेत. त्या प्राथमिक शाळेत असताना किलबिल कार्यक्रमासाठी पुलंचं, नवे गोकुळ हे नाटक बसवलं होतं. त्याला संगीत बाबांनी दिलं होतं. वंदनाताईंचे थोरले बंधु, श्री विश्वनाथ शिरोडकर, विभव नागेशकर यांच्याकडे तबला शिकले आहेत. ते VJTI चे इंजिनीअर आहेत. काही वर्षं नोकरी करून आता पूर्ण वेळ संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या पत्नी सौ. सीमा शिरोडकर सुप्रसिद्ध हार्मोनियम वादिका आहेत.

एकदा गोव्याला वंदनाताईंच्या एका कार्यक्रमाला पं. तुळशीदास बोरकर आले होते. ते म्हणाले, ही चांगली गाते. हिला शास्त्रीय संगीत शिकवा. पं. वसंतराव काडणेकर यांच्याकडे शास्त्रीय संगीताचं शिक्षण सुरु झालं. पाचवीत असताना वंदनाताईंना CCRT, central government ची संगीत शिक्षणासाठीची scholarship मिळाली ती B. A. पर्यन्त. त्यापुढे M. A. करताना सुरश्री केसरबाई केरकर scholarship मिळाली. शास्त्रीय संगीत शिक्षण चालू होतं. शाळेतर्फे अनेक स्पर्धांमधून भाग घेतला, बक्षीसं मिळवली. नंदू होनप यांचं एक गाणं दिवाळीत किलबिलमध्ये गायची संधी मिळाली. पं. यशवंत देव, गीतकार प्रविण दवणे यांच्या बालगीतांची कॅसेट काढत होते. त्यांच्याकडे गाण्यासाठी निवड झाली. त्याच वेळी मीना खडिकरांनी त्यांच्याकडे गाणाऱ्या लहान मुलींबद्दल विचारणा केली. देवांनी वंदनाताईंचं नाव सुचवलं. त्यांच्या आवाजात HMV ची रेकॉर्ड निघाली. त्यानंतर देवांकडेही सुगम संगीत शिक्षण सुरु झालं. दहावीपर्यंत दोन्ही शिक्षणं चालू होती. वंदना ताई अभ्यासात हुशार होत्या. पण त्यांच्या उदयाचल हायस्कूल शाळेतील शिक्षकांनी वडिलांना सुचवलं, हिला गाण्यातच करिअर करू द्या. त्यामुळे दहावीनंतर SNDT ला संगीत विषयात B.A. साठी प्रवेश घेतला.

गुरुजी पं. वसंतराव काडणेकर यांनी वडिलांना सुचवले, आता हिने स्त्री-शास्त्रीय संगीत गायिकेकडे संगीत शिक्षण घ्यावे. वंदनाताईंनी चेंबूर येथे अल्लादियाखां साहेब फेस्टिव्हलमध्ये माणिकताई भिडे यांचं गाणं ऐकलं. ते ऐकून त्या विलक्षण प्रभावित झाल्या. त्यांच्याकडे गाणं शिकावं ही प्रबळ इच्छा मनात निर्माण झाली. पण त्या विद्यार्थिनी म्हणून आपला स्वीकार करतील का? अशी भीतीही मनात होती. पण SNDT येथील सुप्रसिद्ध गायिका, संगीत शिक्षिका आणि माणिकताईंच्या वन्सं सरलाताई भिडे यांच्यामुळे हा प्रवास सुकर झाला आणि

**गुरुकुल**



माणिकताईंकडे जयपूर अत्रौली घराण्याचं संगीत शिक्षण सुरु झालं. एकीकडे वंदनाताईंचे सुगम संगीताचे कार्यक्रम चालू होते. कॉलेजच्या पहिल्या वर्षाला असताना पुण्यात शास्त्रीय संगीताचा पहिला कार्यक्रम केला. ऐकायला गजाननराव वाटवे, अप्पा जळगांवकर अशी दिग्गज मंडळी होती. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला youth festival करिता स्पर्धेत राग जौनपुरी गायल्या. अर्थात् पहिलं बक्षीस मिळालं. सारे श्रोते प्रभावित झाले होते. यानंतर एकूण आपला कल शास्त्रीय संगीताकडे आहे हे त्यांच्या लक्षात आलं. हळूहळू सुगम संगीताचे कार्यक्रम कमी आणि शास्त्रीय संगीताच्या बैठकी वाढत गेल्या.

वंदनाताईंची शैक्षणिक कारकीर्दही झळझळीत आहे. त्या B.A. गोल्ड मेडलिस्ट आहेत. फक्त संगीतात नव्हे तर युनिव्हर्सिटीतून सर्व विषयांतून पहिल्या आल्या. त्यासाठी प्रतिष्ठेचं मानलं जाणारं Chancellor's Award मिळालं. M. A. ला ही गोल्ड मेडल मिळवलं. त्यानंतर M. Fil व त्यानंतर



पं. वि. रा. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली गांधर्व महाविद्यालयातून P.hd. ही पदवी संपादन केली. विषय होता, वृंदगायनाचा क्रमिक विकास. अतिशय सुंदर प्रबंध. परीक्षकांनीही वाखाणला.

P.hd. नंतर वंदनाताईंनी भारतभर प्रोग्रॅम्स केले. नायजेरिया, लागोस, येथेही तीन प्रोग्रॅम्स झाले. त्याच सुमारास त्यांनी क्लास घ्यायला सुरुवात केली. आवाजावर परिणाम होऊ नये म्हणून ग्रुप क्लास कधीच घेतले नाहीत. फक्त one to one क्लास घेतले. तसंच विद्यार्थिनी संख्या मर्यादित ठेवली. सुरुवातीला ज्यांना गाण्यात करिअर करायची आहे, अशा मुलींनाच शिकवायचं असं ठरवलं होतं. पण नंतर, ज्यांना मनापासून आवड आहे आणि तरुण वयात काही अडचणींमुळे शिकायचं राहून गेलं, अशा स्त्रियांना शिकवायला सुरुवात केली. गेली दहा बारा वर्षं मोठ्या स्त्रिया मोठ्या संख्येने गाणं शिकायला येत आहेत. त्यांनाही गाण्याचा आनंद मिळतो, आत्मविश्वास येतो. वंदनाताईंचं म्हणणं, गाणाऱ्याची जशी तयारी असावी लागते, तशीच ऐकणाऱ्या श्रोत्याची असेल तर गाणं अधिक समजून ऐकलं जातं आणि त्याचा आनंद ऐकणाऱ्याला मिळतो. तसंच जाणकार श्रोता मिळाला म्हणून गाणं सादर करणाऱ्या कलाकारालाही मिळतो.

वंदनाताईंचा मोठा गुण म्हणजे संयम. एखादी विद्यार्थिनी थोडी कच्ची असली तरी नाउमेद न होता तिच्यावर अतिशय मेहनत घेतात. त्यामुळे कालांतराने सगळ्याच छान गाऊ लागतात. त्यांच्या अनेक विद्यार्थिनी आज व्यावसायिक संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत.

कॉलेजमध्ये असताना, युनिव्हर्सिटी डे निमित्ताने किशोरीताईंचं अतिशय कठीण असं भजन म्हणायची जबाबदारी वंदनाताईंवर आली. त्यासाठी श्री सुनील सर यांनी त्यांची हार्मोनियमवर साथ केली. पुढे दाट ओळख झाली आणि ही साथ जन्मभराची झाली. सुनील सरांचं घर संगीताचा सन्मान करणारं. त्यामुळे घरच्यांचा पाठिंबा राहिला आणि वंदनाताईंचं गाणं चालू राहिलं. वंदनाताई एक मजेशीर आठवण सांगतात. शाळेत असताना दूरदर्शनच्या एका कार्यक्रमाच्या रिहर्सलसाठी त्या सुनील सरांच्या घरी आल्या होत्या. त्या वेळी कुठे ठाऊक होतं की पुढे या घरी कायमचं यायचं आहे.

हिंदीतील संगीतकार सलील चौधरी यांच्या नानी माँ या चित्रपटासाठी त्यांची मुलगी अंतरा चौधरी हिच्यासह एक हिंदी गीत गाण्याची संधी मिळाली. त्याचे अखंड एक हजार रुपये त्या काळी मिळाले होते.

वंदना ताईंची दोन्ही मुलं, स्वीकार आणि स्वरदा, यांना संगीताचं उपजत आकलन आहे. स्वरदाला शास्त्रीय संगीताची फार आवड नाही. पण कार्यक्रमांतून उपशास्त्रीय उत्तम गाते. मुलगा स्वीकार वडिलांकडून सतार शिकला आहे. संगीत क्षेत्रातील नोकरी सांभाळून डॉक्टरेट करतो आहे. तसंच आजवर देशापरदेशातून सतार वादनाचे भरपूर कार्यक्रम केले आहेत.

आपले पती, मुलं आणि विद्यार्थिनी यांसह वंदनाताई शांत समाधानी जीवन जगत आहेत. त्यांना उत्तम आयुरारोग्य लाभो ही शुभेच्छा !!



**अनुश्री क्षीरसागर**
९८२०५०९७६२

# पावनखिंड



जानेवारी २०२२ हा महिना मराठी चित्रपटांच्यासाठी महत्वाचा महिना असणार आहे. ऐतिहासिक चित्रपट आपल्याला पाहायला आवडत असतात. महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. आजपर्यंत दिग्पाल लांजेकर लिखित आणि दिग्दर्शित दोन ऐतिहासिक मराठी चित्रपटातून छत्रपती शिवाजी महाराजांची दोन भिन्न रूपं पाहायला मिळाली. आता २१ जानेवारी २०२२ या दिवशी प्रदर्शित होणाऱ्या 'पावनखिंड' या चित्रपटातून पुन्हा एकदा छत्रपती शिवरायांचे रूप आपल्याला पाहता येणार आहे. विशेष म्हणजे 'फर्जंद' आणि 'फत्तेशिकस्त' या दोन चित्रपटांच्या अभूतपूर्व यशानंतर 'पावनखिंड'साठी चिन्मय मांडलेकरने पुन्हा एकदा आपल्या मस्तकी छत्रपती शिवरायांचा जिरेटोप चढवला आहे.

ए ए फिल्म्स प्रस्तुत आणि आलमंड्स क्रिएशन्स निर्मित 'पावनखिंड' चित्रपट आहे. चिन्मय मांडलेकर म्हणतो, 'पूर्व संचिताशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा वाट्याला येणं शक्य नाही. लागोपाठ तीन चित्रपटांमध्ये महाराजांची भूमिका साकारायला मिळणं हे मी माझं भाग्य मानतो. दिग्पालला माझ्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची छबी दिसली आणि त्यानं ते शिवरूप यशस्वीपणे रसिकांसमोरही सादर केलं हे खूप महत्त्वाचं आहे.'पावनखिंड'मध्ये बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल सेनेने स्वराज्य आणि महाराजांच्या रक्षणाकरीता दिलेल्या अमूल्य बलिदानाची सुवर्णगाथा पहायला मिळणार आहे. अजय आरेकर, अनिरुद्ध आरेकर आणि भाऊसाहेब आरेकर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

**मनोरंजन विश्व**

# कॉफी



**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

जानेवारी महिन्यात १४ तारखेला 'तन्वी फिल्मची प्रस्तुती' असणारा 'कॉफी ' हा मराठी चित्रपट प्रदर्शित होत आहे. या चित्रपटाची निर्मिती कैलास सोरारी आणि विमला सोरारी यांनी केली असून चित्रपटाचे दिग्दर्शन नितीन कांबळे यांनी केले आहे. चित्रपटाच्या कथानकाविषयी थोडेसे. रणजित आणि रेणू हे जोडपं आहे. त्यांचा प्रेमविवाह,पण बरेच वर्ष एकमेकांना नीट वेळ न दिल्याने त्यांच्या नात्यात थोडा दुरावा निर्माण झाला आहे. याच परिस्थितीत रेणुकाच्या आयुष्यात रोहित येतो आणि तिच्यातील अल्लड रेणू परत मिळवून देण्यात तो मदत करतो. दोघेही प्रेमात पडतात.पण मग रणजितचे काय? रेणुका काय निर्णय घेते? याची उत्तरे आपणाला 'कॉफी ' चित्रपटात पाहायला मिळतील. रेणुकाची भूमिका स्पृहा जोशी हिने,तर रणजितची भूमिका कश्यप परुळेकर याने केली आहे,तर रोहितच्या भूमिकेत सिद्धार्थ चांदेकर हा अभिनेता आहे. चित्रपटाची कथा आणि पटकथा मच्छिन्द्र बुगडे यांची आहे. मच्छिन्द्र यांनीच नितीनच्या साथीने संवाद लेखनाची जबाबदारी पण पेलली आहे.